# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2019-20)/02/ of 2019**

परिपत्रक:

विषय:– दिनांक २९ एप्रिल, २०१९ रोजी होणाऱ्या मतदानासाठी विद्यार्थ्यांना आवर्जून मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करण्याबाबत.

संदर्भ:– सहसंचालक, उच्च शिक्षण विभागाचे क्र. ससं/उशि/ मुंवि/शास. आस्था/२०१९/८४१ दिनांक ८ एप्रिल, २०१९ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमूख आणि संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, मा. भारत निवडणूक आयोग व मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या निर्देशानुसार तसेच दिनांक ८ एप्रिल, २०१९ रोजी मा. जिल्हाअधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई उपनगर, जिल्हा– बांद्रा–पूर्व येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकित दिलेल्या निर्देशानुसार सोमवार दिनांक २९ एप्रिल, २०१९ रोजी होणाऱ्या मतदानाचा टक्का जास्तीत जास्त वाढविण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना/ विद्यार्थीनींना दिनांक २९ एप्रिल, २०१९ रोजी आवर्जून मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करावेत.

तसेच महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थी मतदान करण्यासाठी प्रोत्साहित होतील असे उपक्रम महाविद्यालयामार्फत दिनांक २९ एप्रिल, २०१९ पूर्वी तातडीने राबवावे. या लोकशाहीच्या उत्सवात सर्व विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी मुंबई विद्यापीठाशी संलग्नित अनुदानित/ विनाअनुदानित सर्व महाविद्यालयानी मतदानासंदर्भात जनजागृतीबाबत आपल्या स्तरावर सूचित करावे.

(डॉ अजय देशमुख)
कुलसचिव

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमूख आणि संचालक.